# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

**<u>क्र. स.अ(परि.)जी/द/८१२/एस.आर दि. ३०.०७.२०२६.</u>**

## <u>सूचना</u>

**विषय :** आगामी गणेशोत्सव-२०२६ निमित्त आवश्यक साहित्य/वस्तूंचे बाजारभावानुसार दरपत्रक मागविणेबाबत.

ज्याअर्थी आगामी गणेशोत्सव-२०२६ निमित्त जी/दक्षिण विभागामार्फत घरगुती गणपती व सार्वजनिक गणपती विसर्जनाकरीता आवश्यक त्या नागरी सुविधा पुरविण्याचे काम करण्यात येणार आहे. सदर कामांसाठी प्रमुख अभियंता (इमारत परिरक्षण) यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील मंजूर दरानुसार कामे करणे अपेक्षित असते. तथापि, परिपत्रकामध्ये समाविष्ट नसलेल्या अथवा सध्याच्या बाजारभावानुसार खरेदी करणे आवश्यक असलेल्या काही साहित्य/वस्तूंची आवश्यकता भासणार असल्याने, सदर साहित्य/वस्तूंचे प्रचलित बाजारभावानुसार स्पर्धात्मक दर प्राप्त करणे आवश्यक आहे.

सदर सूचनेनुसार खालीलप्रमाणे आवश्यक साहित्य/वस्तूंच्या बाजारभावानुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत. आवश्यक असलेल्या साहित्य/वस्तूंची यादी :

| Sr.No | Particulars | Unit | Rate |
|---|---|---|---|
| 1 | Providing Pontoons | Nos | |
| 2 | Providing Life Boats | Nos | |
| 3 | Supply of Crane | Nos | |

त्याअनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे नोंदणीकृत व संबंधित प्रकारची कामे/पुरवठा करण्यास पात्र असलेल्या कंत्राटदारांनी वरील नमूद केलेल्या तक्त्यानुसार साहित्य/वस्तूंचे दरपत्रक (Rate Quotation) सादर करावयाचे आहे. सदर दरपत्रकामध्ये प्रत्येक वस्तूचे नाव, तपशील (Specification), मोजमापाचे एकक (Unit), प्रति एकक दर, लागू कर (GST असल्यास), तसेच आवश्यक असल्यास वाहतूक, चढ-उतार व इतर सर्व खर्चासह अंतिम दर स्पष्टपणे नमूद करावेत. सादर करण्यात येणारे दरपत्रक अधिकृत लेटरहेडवर, स्वाक्षरी व शिक्क्यासह, सीलबंद लिफाफ्यामध्ये दि. ०४.०८.२०२६ दु. १.०० वा. पर्यंत खालील पत्त्यावर सादर करावे.

सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण यांचे कार्यालय,<br>
सहाय्यक अभियंता (परिरक्षण) जी/दक्षिण<br>
१ ला मजला, धनमिल नाक, ना.म.जोशी मार्ग,<br>
लोअर परळ, मुंबई – ४०० ०१३.

प्राप्त दरपत्रकांचा विचार करून प्रचलित नियम, अटी व महानगरपालिकेच्या कार्यपद्धतीनुसार योग्य ते दर निश्चित करण्यात येतील. विभागास कोणतेही अथवा सर्व दरपत्रके स्वीकारण्याचा किंवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा तसेच आवश्यकतेनुसार संपूर्ण किंवा अंशतः मागणी स्वीकारण्याचा अधिकार राहील. याबाबत कोणताही दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

सर्व इच्छुक महानगरपालिकेचे नोंदणीकृत कंत्राटदार यांनी विहित मुदतीत दरपत्रके सादर करून सहकार्य करावे, ही विनंती.

सही/-<br>
**सहाय्यक अभियंता (परिरक्षण) जी/दक्षिण**